


दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

1,22,570 डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे पुण्यातील लोकप्रिय दैनिक

● वर्ष : ०२ ● अंक : १२२ ● पुणे ● शनिवार, दि. २२ मार्च २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313



क्षेत्रभेटीच्या माध्यमातून पत्रलेखन : अनोखा उपक्रम 3




जागतिक व्यापारावर वर्चस्व मिळवण्याची संधी 4

## ठळक बातम्या

### अभियंत्याकडून तीन वर्षांच्या मुलाचा खून

पुणे (आरंभ पर्व): पत्नीच्या चारित्र्याचा संशय घेऊन संगणक अभियंत्याने स्वत:च्या तीन वर्षांच्या मुलाचा चाकूने गळा चिरून खून केल्याची धक्कादायक घटना शुक्रवारी उघडकीस आली. नगर रस्त्यावरील मोकळ्या जागेत मुलाचा मृतदेह दुपारी सापडला. हिंमत माधव टिकेटी (वय ३) असे खून झालेल्या मुलाचे नाव आहे. याप्रकरणी माधव साधुराम टिकेटी (वय ३८, रा. रतन प्रेस्टीज बिल्डिंग, चंदननगर) याला चंदननगर पोलिसांनी अटक केली. याबाबत माधवच्या पत्नीने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

### मतदान केंद्रावर आता १२०० मतदार

पुणे (आरंभ पर्व) : मतदान केंद्रांवरील रांगा कमी करण्याच्या उद्देशाने केंद्रीय निवडणूक आयोगाने यापुढे प्रत्येक मतदान केंद्रावर १ हजार २०० मतदारच असतील, या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश सर्व राज्यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना दिले आहेत. परिणामी, प्रत्येक मतदान केंद्रावरील पूर्वीची दीड हजार मतदारांची संख्या कमी होणार असल्यामुळे मतदान केंद्रांची संख्या किमान २५ टक्क्यांनी वाढेल. यासह मतदानासाठी आवश्यक असणारे मतदान यंत्र, कंट्रोल युनिट आणि व्हीव्हीपॅट यांची संख्याही देखील वाढणार आहे. मतदान सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक असणारी यंत्रणा अर्थात अधिकारी, कर्मचारी व सुरक्षा व्यवस्था यातही वाढ करावी लागणार आहे. प्रत्येक मतदाराला त्याच्या दोन किलोमीटर परिघातच मतदान केंद्र उपलब्ध करून द्यावे, अशा सूचनाही आयोगाने दिले आहेत.

### फडणवीस यांनी भाग पाडलं का?

पुणे (आरंभ पर्व) : छत्रपती शिवरायांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केल्याप्रकरणी आणि कोल्हापूरातील इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांना जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी प्रशांत कोरटकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र बऱ्याच तपासानंतरही प्रशांत कोरटकर पोलिसांच्या हाती लागलेला नाही. एकीकडे पोलिसांकडून शोध सुरु असताना प्रशांत कोरटकर दुबईला गेल्याचे समोर आले आहे. विरोधकांडून यावरून महाराष्ट्र पोलीस आणि सत्ताधाऱ्यांवर ताशेरे ओढले जात आहेत. अशातच कोरटकरला पळून जाण्यासाठी पोलिसांना मदत करायला देवेंद्र फडणवीस यांनी भाग पाडलं का? असा सवाल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी उपस्थित केला आहे. सपकाळ म्हणाले, आज छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचं विधान करणारा विकृत माणूस कोरटकर हा देशाबाहेर पळून गेला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारने योजना आणली आहे की, महाराजांचा अपमान करा आणि सुरक्षा मिळवा. फडणवीस आणि कोरटकर यांचे हितसंबंध आहेत का? असा सवाल सपकाळ यांनी उपस्थित केला. त्याला सुरक्षा मिळत असेल कारण. महाराजांचा अपमान केल्यावर त्याला सुरक्षा कस काय मिळते तो पळून कसा जातो. यांच्यावर सरकार कारवाई का करत नाही. नाहक औरंगजेबाचा मुद्दा उकरून काढला आहे.

# लोणी काळभोरचे पोलीस उपनिरीक्षक अमोल घोडके निलंबित

## पोलिसानेच आरोपीस अप्रत्यक्षरित्या मदत केल्याचे आले समोर

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

गुन्हेगारास स्थानिक पोलिसाने मदत केल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. तपासात पोलिसानेच गुन्हेगारास अप्रत्यक्षरित्या मदत केल्याचे समोर आल्याने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात कर्तव्यास असलेले पोलीस उपनिरीक्षक अमोल घोडके यांना निलंबित करण्यात आले आहे. याबाबतचा आदेश अप्पर पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी काढला आहे.

एका महिलेच्या डोक्यात दगड मारून, तसेच पतीवर पिस्तुलातून गोळीबार करून पसार झालेल्या दोन आरोपींना गुन्हे शाखेने अटक केली. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या महिलेचा खासगी रुग्णालयात मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतर याप्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

थेऊर येथील लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या गुन्ह्यातील तपासी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक अमोल घोडके यांनी मुख्य आरोपी भरत जैद याला अप्रत्यक्षरित्या मदत केली आहे. ज्यावेळी हा गुन्हा घडला, त्यावेळी जैद घटनास्थळी हजर नव्हता, असे साक्षीदार सुदर्शन यशवंत आगळने व प्रतिक रमेश बिटे जबाब तपास टिपणांमध्ये नमुद करुन ती तपास टिपणे गुन्ह्याच्या कागदपत्रांत समाविष्ठ केली. परंतु, लोणी काळभोर वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी केलेल्या तपासादरम्यान आरोपी भरत जैद हा घटना घडली, त्यावेळी घटनास्थळी हजर



असल्याचे सबळ पुरावे मिळाले आहेत.

पोलीस उपनिरीक्षक घोडके यांनी बारामती येथील तिरुपती हॉटेलचे सीसीटीव्ही फुटेज जप्त करून भरत जैद हा बारामतीवरून पुण्याच्या दिशेने येताना त्याच्या इतर ७ साथीदारांसोबत काळ्या रंगाच्या फॉर्च्यूनर गाडीमध्ये आला नाही. तर, तो सुदर्शन आगळमे यांच्यासोबत त्यांच्याकडील शेवोरलेट गाडीमध्ये बसून आला होता. त्यानंतर जैद हा थेऊर मार्गे न जाता हडपसर, विश्रांतवाडी मार्गे गेला होता, असे निष्पन्न करण्याचा प्रयत्न केला. परंतु, तपासादरम्यान भरत जैद हा गुन्ह्यात जप्त केलेल्या काळ्या रंगाच्या फॉर्च्यूनर गाडीमध्ये बसूनच सुपा पोलीस ठाणे येथून त्याच्या इतर सात साथीदार यांच्यासह निघाला होता.

त्यानंतर मोशी येथे थेऊर, केसनंद मार्गेच गेल्याचे सबळ पुरावे मिळाले आहेत. यावरुन पोलीस उपनिरीक्षक अमोल घोडके यांनी आरोपीस आप्रत्यक्षरित्या मदत केल्याचे निष्पन्न होत असल्याचे निलंबन आदेशात नमूद केले आहे. घोडके यांना निलंबन कालावधीत कोणतीही खाजगी नोकरी करता येणार नाही. तसेच घोडके यांना दररोज शिवाजीनगर येथील पुणे पोलीस मुख्यालय राखीव पोलीस निरीक्षक यांच्याकडे हजेरीसाठी उपस्थित राहावे लागणार आहे.

## कला केंद्रातील डान्स बार बंद करण्याची मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

● कलाकारांवर उपासमारीची वेळ आल्याची सुरेखा पुणेकर यांची टीका

राज्यभरातील कला केंद्रामध्ये सर्रासपणे सुरू असलेले डान्स बार तातडीने बंद करण्याची मागणी लावणीसम्राज्ञी सुरेखा पुणेकर यांनी शुक्रवारी केली. कला केंद्रातील तबला, ढोलकी आणि पायपेटी ही वाद्ये आणि लावणी गायिका यांना वगळून तेथे डीजे वाजवून कला सादर केली जात असल्याने राज्यभरातील दहा हजार कलाकारांवर उपासमारीची वेळ आली आहे, याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच, 'शेतकऱ्यांप्रमाणे कलाकारांनीही आत्महत्या करायची का,' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. या संदर्भात मंत्रालयासमोर उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला. सुरेखा पुणेकर यांनी पत्रकार परिषदेत विविध मागण्या केल्या. अखिल महाराष्ट्र लोकनाट्य सांस्कृतिक कलाकार संघटनेचे अध्यक्ष धोंडीराम जावळे, विकास जावळेकर, चंद्रकांत लाखे या वेळी उपस्थित होते. पुणेकर म्हणाल्या, 'माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी राज्यातील डान्स बार बंद केल्यानंतर लावणी कलाकारांना दिलासा मिळाला होता. मात्र, त्यानंतरच्या सरकारने आणि गृहमंत्र्यांनी कडक धोरण न राबविल्यामुळे डान्स बार पुन्हा सुरू झाले आहेत. तबला, ढोलकी आणि पायपेटी ही वाद्ये वाजविणारे वादक आणि लावणी गायिका अशा पारंपरिक पद्धतीने लोककला सादर करण्याच्या अटीवरच कला केंद्रांना परवाना दिला जातो.

# रायगडाच्या पायथ्याला अन्नत्याग आंदोलन सुरू

**रायगड (दै. आरंभ पर्व)**

प्रहार दिव्यांग क्रांती संस्था व प्रहार जनशक्ती पार्टीच्या वतीने दिव्यांग व शेतकरी बांधवांच्या विविध मागण्यांसाठी आजपासून (२१ मार्च) दिव्यांग मंत्रालयाचे माजी आमदार बच्चू कडू यांच्या नेतृत्वात तीन दिवस अन्नत्याग आंदोलन रायगडाच्या पायथ्याशी पाचाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्राशेजारी सुरू करण्यात आले आहे. यावेळी आंदोलनाचे संयोजक व प्रहार जनशक्ती पार्टीचे सचिन साळुंखे, ओंकार साळुंखे, प्रहार अपंग क्रांती संस्थेचे महाराष्ट्र सचिव सुरेश मोकळ, राज्याध्यक्ष धर्मेंद्र सातव, रायगड जिल्हा अध्यक्ष सुनील गणबोडे, महाराष्ट्र संपर्कप्रमुख रामदास खोत, अभियान प्रमुख महेश बडे आदी उपस्थित होते. राज्यभरातील दिव्यांग मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले आहेत.

यावेळी बोलताना बच्चू कडू म्हणाले, "आज देशात आणि राज्यात धर्म आणि



जातीपातीचे घाणेरडे राजकारण केले जात आहे. सरकारला नागरिकांच्या मूलभूत गरजांचा विसर पडल्याचे दिसून येत आहे. प्रत्येक धर्माच्या लोकांना पोट असते आणि त्याकरिता सरकारने प्रयत्न केले पाहिजेत. औरंगजेबाने त्याच्या काळात जेवढे लोक मारले नसतील, त्यापेक्षा अधिक लाखो शेतकऱ्यांनी राज्यात सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे आत्महत्या केल्या आहेत. परंतु त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. औरंगजेबाने तलवारीच्या टोकावर लोकांना मारले. मात्र, सध्याचे राज्यकर्ते हे त्यांच्या विविध धोरण, कलमाने मारत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे सरकारने धर्म, जात यावर राजकारण करण्यापेक्षा नागरिकांच्या मूलभूत समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत."

कडू पुढे म्हणाले, "सर्वत्र महागाई वाढलेली असून दिव्यांगांना मागील चार महिन्यापासून कोणतेही मानधन मिळत नाही. त्यांचे जीवन असह्य झाले आहे. याबाबत सरकार कोणतीही दखल घेताना दिसत नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी किंवा शेतीच्या शेतमालास योग्य भाव मिळत नाही. त्यामुळे शेतकरी देखील हवालदिल झालेला आहे. लाडकी बहीण नाममात्र असून, राज्याच्या अर्थसंकल्पात शेतकरी, मजूर, दिव्यांग, कामगार यांच्यासाठी कोणतीही विशेष तरतूद न करता केवळ अनुदान कपातीचे धोरण आखले जात आहे. दिव्यांग मंत्रालय निर्माण करण्यात येऊन १४०० कोटींची तरतूद करण्यात आली. मात्र, त्यापैकी १२०० कोटी रुपये केवळ पगारावर खर्च केले जात आहे. मुबलक निधी नसेल, तर दिव्यांग मंत्रालय कशाप्रकारे काम करणार हे सरकारने स्पष्ट करावे.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

WE ARE HIRING !
Open Position
VIDEO EDITOR

आपला बायोडाटा खालील ईमेलवर पाठवावा.
for Video Editor असा स्पष्ट उल्लेख करावा.
aparvinfo@gmail.com & ganganepratik4@gmail.com



Call Now ७२७६३१४१४२



दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा

वार्ताहर नेमणे आहे

पुणे आणि जिल्ह्यात लोकप्रिय दै.आरंभ पर्वसाठी खालीलप्रमाणे जिल्हा व तालुकास्तरावर वार्ताहर नेमणे आहेत.

सिंहगड रोड भागातील जनतेचा आवाज.. इथं आहे जनहिताचे सर्व दैनिक आरंभपर्व

पुणे जिल्हा
इंदापूर शहर, इंदापूर ग्रामीण, बारामती, उरुळी कांचन, यवत, केडगाव, सुपा, भिगवण, सासवड, पुरंदर,जेजुरी, नीरा, सोमेश्वर, माळेगाव, भोर, वेल्हा. चाकण, राजगुरूनगर, मंचर, जुन्नर, घोडेगाव, लोणी काळभोर

पुणे शहर
धायरी, स्वारगेट, हडपसर, कॅम्प, वडगाव बुद्रुक, पर्वती, डेक्कन, सिंहगड रोड, कात्रज, कोंढवा

इच्छुकांनी आपला बायोडाटा खालील ई-मेल वर पाठवावा.
aparvinfo@gmail.com

वार्ताहरांना मिळणाऱ्या सुविधा
आयडीकार्ड, नियुक्तीपत्र, युट्युबसाठी लागणारा माईक




(टीप - वरील गोष्टी देण्यापूर्वी किमान एक महिने काम करणे आवश्यक. आपले काम बघून पुढील निर्णय घेतला जाईल.)

दै.आरंभपर्व मीडिया समूह 7276314142 / 9284559577 / 8605284272

# करिअरची दिशा ठरवा



आपल्याला विविध क्षेत्रांत करिअरच्या संधी असतात. त्यासाठी योग्य वेळी आपल्याला आपल्या करिअरची दिशा ठरवावी लागेल. एकदा संधी गेली की परत येत नाही. लोकप्रिय क्षेत्र आणि जास्त पगार कुठे मिळतो याच्या आपण शोधात असतो. सध्या ही परिस्थिती बदललेली आहे. तेव्हा आता जरी दहावी आणि बारावीची परीक्षा संपल्याने मोकळा श्वास घेऊ नंतर बघू करिअरचे असे न करता परीक्षेचा निकाल लागण्याच्या पूर्वी आपल्याला कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा आहे. नंतर आपण कोणती पदवी संपादन करणार आहोत. त्यानंतर रोजगाराच्या संधी कोणत्या आहेत याचा विचार करून आपल्या करिअरची दिशा ठरवावी लागेल त्यासाठी थोडक्यात घेतलेला वेध.

जीवनात स्वत:चे करिअर घडविण्यासाठी त्याला योग्य दिशा द्यावी लागते. जर दिशा चुकली की काय होते याची सर्वांना कल्पना आहे. तेव्हा विद्यार्थीदशेतच विद्यार्थ्यांना आपल्या करिअरची दिशा ठरवावी लागेल. प्रत्येकाच्या जीवनात दहावी आणि बारावीची बोर्डाची परीक्षा अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा प्रत्येकाचे करिअर या बोर्डाच्या परीक्षेवर अवलंबून असते. १५ मेच्या आत बोर्डाच्या परीक्षेचा निकाल जाहीर होईल. यात कोणाला यश तर काहींना अपयश, काहीजण विशेष श्रेणीत पास तर काहींना अपेक्षेप्रमाणे खूपच कमी गुण त्यामुळे निकाल लागल्यानंतर नेमके काय करावे याच्या शोधात असतात. तेव्हा आपल्याकडे वेळ सुद्धा नसतो. यामुळे आपली इच्छा असून सुद्धा आवडीच्या अभ्यासक्रमापासून वंचित राहतो. याचा परिणाम आपल्या आवडीचे क्षेत्र नसल्यामुळे आपण अभ्यासाकडे दुर्लक्ष करतो, यामुळे आपण त्यामध्ये अयशस्वी होतो. नंतर आपण ओरडत बसतो की, आपल्या करिअरची दिशा चुकली. तेव्हा दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरची दिशा ठरवावी. म्हणजे निकाल लागल्यावर योग्य अभ्यासक्रमाला पसंती देता येईल.

आता दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा संपल्यामुळे विश्रांती न घेता आपल्या



करिअरच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपले करिअर ठरवताना स्वत:ची आवड आणि आपल्याकडे असलेले कौशल्य याचा विचार करून करिअरची निवड करावी. त्या आनुषंगाने आपल्या विभागात किंवा जवळपास ज्या शिक्षण संस्था असतील त्यांना भेट देऊन त्या अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम व प्रवेश प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. हल्ली अनेक ठिकाणी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया असते. त्यात सीईटी परीक्षा यामुळे विद्यार्थ्यांचा ताण वाढत आहे. विरारमध्ये तर बारावीच्या काही प्रश्नपत्रिका जळल्यामुळे निश्चितच त्याचा परिणाम निकालावर होणार आहे. असे असले तरी शेवटी सरासरी गुण दिले जातात याची सर्व विद्यार्थ्यांना माहिती आहे. तेव्हा आपल्या करिअरची दिशा ठरविण्यासाठी आतापासून करिअरच्या शोधात असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांनी, आपले ध्येय काय आहे हे ओळखून नवनवीन कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. त्यासाठी वेगवेगळ्या शिक्षण संस्थांमध्ये जाऊन त्यांची मदत घ्यावी. यामध्ये व्यावसायिक शिक्षण संस्था, उद्योग मार्गदर्शन केंद्र, रोजगार मार्गदर्शन केंद्र आणि विद्यापीठ मार्गदर्शन केंद्र यांची मदत घेतली पाहिजे. त्यामुळे विविध अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या संधी यांची कल्पना येते. काही ठिकाणी निकाल लागल्यानंतर 'करिअरची दिशा' या शीर्षकाखाली चर्चासत्राचे आयोजन केले जाते. त्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येते. तेव्हा शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने जरून चर्चासत्राचे आयोजन करण्यात यावे. मात्र ते बोर्डाच्या निकालापूर्वी करावे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक उत्तेजन मिळते. तसेच करिअरची दिशा ठरविल्याने आपले ध्येय निश्चित होते. त्याप्रमाणे आपण पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतो. एक प्रकारे मनावरचा ताण कमी होण्याला मदत होते. यामुळे आपल्या कारकिर्दीला सुरुवात होऊन आपले लक्ष आपल्या ध्येयावरती केंद्रित करता येते. तसेच पुढे निर्माण होणाऱ्या अडचणींवर सहज मात करता येते. यामुळे आपल्याला खरी प्रेरणा मिळून आपला आत्मविश्वास वाढण्याला मदत होते. याचा परिणाम आपल्याला कठोर परिश्रम घेण्याची जिद्द निर्माण होते. त्याचप्रमाणे आपल्याला निर्णय घेणे सुद्धा सोपे जाते. आपल्या पसंतीप्रमाणे ध्येय साध्य करायचे असल्याने आपली जबाबदारी सुद्धा वाढते. त्यामुळे अधिक उत्साहाने काम करण्यास सक्रिय होतो. त्याआधी आपल्या आवडीच्या ध्येयावर चिंतन करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपले ध्येय साध्य करणे अधिक सुलभ होऊन आपली प्रगती करता येते. यात काही वेळा बदल करणे गरजेचे असते. त्यानुसार बदल करायला शिका. नक्कीच त्यातून नवीन चांगला बदल झालेला दिसून येईल. यासाठी महत्त्वाकांक्षा अधिक महत्त्वाची असते. त्यासाठी आपल्या मनावर ठाम राहायला हवे. त्यासाठी ध्येयाच्या चांगल्या-वाईट परिणामाचा अभ्यास करायला हवा. तेव्हा काही परिस्थिती गृहीत धरून ध्येय स्वीकारता आले पाहिजे किंवा ध्येय जुळवून घेता आली पाहिजेत. त्यात आपलाच विजय असतो हे मात्र प्रत्येक विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवायला हवे. तेव्हा ध्येय निश्चित करण्यापूर्वी विचार करून निर्णय घ्यावा. शेवटी आपल्या करिअरचा प्रश्न असतो. पुढे निर्माण होणाऱ्या प्रश्नांना हसत हसत सामोरे जाण्याची जिद्द निर्माण झाली पाहिजे. तरच आपले करिअर आपण घडवू शकतो. राज्यात आज कंत्राटी हंगामी कर्मचाऱ्यांना सुद्धा वेळेवर पगार मिळत नसल्यामुळे पालकमंत्र्यांना साकडे घालण्याची वेळ आली आहे. त्यासाठी आपले पुढील ध्येय ठरविताना विद्यार्थ्यांनी आपली आवड-निवड आणि भविष्याचा विचार करून आपल्या करिअरची दिशा ठरवावी.

# नव्याने समाविष्ट ३२ गावांसाठी महापालिकेने दिले काय?

- **भीमराव तापकीर यांनी विधीमंडळात विचारला प्रश्न : आयुक्तांची**
- **गावांच्या अडचणी सोडविण्यासाठी पुढील आठवड्यात होणार बैठक**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुण्यामध्ये नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांनी पुणे महापालिकेला किती मिळकत कर दिला? आणि महापालिकेने काय सोयी सुविधा उपलब्ध करून दिला? पुणे महापालिका आयुक्तांनी या गावांबाबत कोणताच निर्णय घेतला नाही त्यांच्याकडे ती क्षमताच नाही अशी खरमरीत टीका खडकवासला मतदार संघाचे आमदार भीमराव तापकीर यांनी विधानसेभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात केली.

पुणे शहराच्या चोहू बाजूने असलेल्या ३२ ग्रामपंचायती पुणे महापालिकेत विसर्जित करून पुणे शहाराचा विस्तार करण्यात आला. त्यामुळे या गावांचा महसुली कर ग्रामपंचायत ऐवजी महापालिकेत जमा होत आहे.

३२ गावांतून कोट्यवधी रुपयांचा कर महापालिकेला मिळत आहे मात्र त्या तुलनेत या गावांमध्ये ना रस्ते, ना ड्रेनेज, ना शुध्द पाणीपुरवठा महापालिकेत पुरवते आहे, त्यामुळे या गावांनी एकत्र येऊन कृती समिती स्थापन करून अनेकवेळा आंदोलन केले आयुक्तांना निवेदने दिली आहेत. मात्र आयुक्तांनी त्याबाबत ठोस निर्णय घेतला नाही. त्यामुळे आमदार भीमराव तापकीर यांनी ३२ गावांचा प्रश्न विधानसभेत विचारला.

## कौशल्य विकास केंद्र लवकरच

**तब्बल १९० कोटी रुपयांचे देशातील सर्वात मोठे कौशल्य विकास केंद्र पुण्यामध्ये लवकरच होणार आहे. उद्योजक रतन टाटा हयात असताना याबाबत निर्णय झाला आहे. त्यासाठी १६० कोटी रुपये टाटा ग्रूपकडून सीएसआर व्दारे मिळणार आहे तर उर्वरित रक्कम पुणे महापालिका देणार आहे. याची बैठक लवकरच होणार असून त्या बैठकीला सर्वांना बोलाविण्यात येईल अशी माहिती उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली.**

आमदार तापकीर म्हणाले की, ३२ गावांनी मिळून महापालिकेला आत्तापर्यंत किती टॅक्स दिला आहे. तो आकडा मंत्रीमहोदयांनी द्यावा तो आता उपलब्ध नसेल तर तातडीने या गावांच्या समस्या सोडविण्यासाठी एक बैठक घ्यावी आणि त्यावेळी या गावातून मिळालेले महसूली उत्पन्न सांगावे. गावनिहाय कराची रक्कम सांगावे. त्यावर विधानसभा अध्यक्षांनी याबाबत तातडीने बैठक घेण्याची सुचना मंत्री उदय सामंत यांना दिली.

# थोडक्यात

## ललिता सूर्यवंशी यांचे निधन



**राजगुरुनगर (आरंभ पर्व) : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रदेश महिला उपाध्यक्षा अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील यांच्या मातोश्री आणि खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या सासूबाई ललिता राजेंद्र सूर्यवंशी (७७) यांचे निधन झाले. संभाजीनगर येथील जकात नाका स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. धाराशिव जिल्ह्यातील भंडारी हे त्यांचे मूळ गाव होते. त्यांच्या पश्चात अ‍ॅड. राजमाला बुट्टेपाटील, कांचन देसाई आणि रचना सातव या तीन मुली आहेत. तर त्यांचा मुलगा प्रमोद सूर्यवंशी हे पुण्यात बांधकाम व्यवसायिक म्हणून कार्यरत आहेत तर दुसरा मुलगा डॉ. प्रवीण सूर्यवंशी हे ऑल इंडिया सर्जिकल असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. याशिवाय जावई, आणि नातंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे पती स्व. डॉ. राजेंद्र सूर्यवंशी ह्यांनी खेड, आंबेगाव, जुन्नर, शिरूर, अकोला, संगमनेर भागामध्ये मुक्या प्राण्यांची सेवा करताना शेतकऱ्यांना दुधाच्या माध्यमातून मिळणाऱ्या उत्पनाचे महत्त्व पटवून धवलक्रांती केली होती. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.**

## महाराष्ट्र युवक काँग्रेसच्या नियुक्त्या अवघ्या ८ तासात रद्द

- **युवक काँग्रेसलाही गटबाजीचे ग्रहण?**



**पुणे (आरंभ पर्व) : युवक काँग्रेसलाही गटबाजीचे ग्रहण लागले आहे. प्रदेश शाखेच्या नव्याने करण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या अखिल भारतीय युवक काँग्रेसने अवघ्या ८ तासांमध्ये रद्द केल्या. राज्य युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांनी रात्री १२ वाजता नवीन नियुक्त्यांची यादी अधिकृत व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवर जाहीर केली. मात्र, भारतीय युवक काँग्रेसच्या दिल्ली मुख्यालयाने सकाळीच या नियुक्त्या रद्द केल्याचे पत्र प्रसिद्ध केले. या पत्रात स्पष्ट नमूद करण्यात आले की, नियुक्त्या कोणत्याही अधिकृत मंजुरीशिवाय केल्या गेल्याने त्या अवैध ठरविण्यात आल्या आहेत. त्याबरोबरच ज्यांनी कोणी या नियुक्त्या केल्या त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचा इशाराही दिला. यामध्ये २० प्रदेश उपाध्यक्ष, ८ कार्याध्यक्ष व अन्य अनेक नियुक्त्या होत्या. या घटनेनंतर प्रदेश युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये आता कोणामागे रहायचा असा प्रश्न निर्माण झाला आहे. यामुळे विद्यमान प्रदेशाध्यक्ष कुणाल राऊत व अखिल भारतीय युवक काँग्रेसचे पदाधिकारी यांच्यातील मतभेद यातून उघड झाले. केंद्रीय समितीच्या नियमांप्रमाणे प्रदेशाध्यक्षांसह कोणालाही कसलीही नियुक्ती करायची असेल तर त्यासाठी केंद्रीय समितीची मान्यता लागते. राऊत यांनी अशी कोणताही मान्यता घेतली नव्हती. त्यामुळे केंद्रीय समितीने तातडीने दिल्लीहून पत्रक प्रसिद्ध करून फक्त ८ तासांमध्ये या सर्व नियुक्त्या रद्द करून टाकल्या. केंद्रीय समितीमध्ये राष्ट्रीय सचिव असलेल्या अजय चिंकारा,एहसान खान, कुमार रोहित यांच्या या पत्रकावर स्वाक्षऱ्या आहेत. याच पत्रकात त्यांनी कोणत्याही मान्यतेशिवाय कोणाचीही नियुक्ती करणे ही गंभीर व शिस्तभंग करणारी गोष्ट आहे असे म्हटले आहे. तसेच ज्यांनी कोणी या नियुक्त्या केल्या, त्याचा शोध घेऊन संबधितांवर कारवाई केली जाईल असा इशाराही दिला आहे.**

# मलाबार गोल्ड अँड डायमंड्स मार्चमध्ये १२ नवीन शोरूम उघडणार

- **१३ देशांमध्ये ३९१ शोरूमपर्यंत जागतिक विक्री जाळ्याचा विस्तार**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जगातील सहाव्या क्रमांकाचे सर्वात मोठे दागिने विक्रेते असलेल्या, मलाबार गोल्ड अँड डायमंड्स भारतात आपली उपस्थिती आणखी मजबूत करत असून, मार्च २०२५ अखेरपर्यंत १२ नवीन शोरूम सुरू करणार आहे. या नवीनतम विस्तार मोहिमेमुळे १३ देशांमध्ये त्याच्या एकूण शोरूमची संख्या ३९१ पर्यंत जाईल आणि भारतातील १९ राज्यांमध्ये त्याची उपस्थिती असेल. नियोजित नवीन शोरूम मुंबईतील पनवेल, पुण्यातील सिंहगड रोड, ओडिशातील ब्रह्मपूर आणि सौभाग्य नगर; झारखंडमधील धनबाद, कर्नाटकातील होस्पेट, नगरभावी आणि चित्रदुर्ग; आंध्र प्रदेशातील नंद्याल, अमलापुरम, मछलीपटनम, उत्तर प्रदेशातील वाराणसी येथे सुरू आहेत. मलाबार समूहाने या विस्तार टप्प्यात ६०० कोटी रुपये गुंतवले आहेत आणि या आर्थिक वर्षात ४०६ कर्मचाऱ्यांची नव्याने भरती करून, त्यांची विविध भूमिकांवर नियुक्ती केली आहे.मलाबार गोल्ड अँड डायमंड्स विद्यमान २०२५ सालात एकंदर ६० नवीन शोरूम उघडण्याची योजना आखत आहे, ज्यामुळे त्यांची जागतिक उपस्थिती आणखी विस्तारेल. एप्रिल २०२५ मध्ये, समूह आणखी ५ नवीन शोरूम उघडण्यास सज्ज झाले आहे, ज्यायोगे दक्षिण आशिया, ब्रिटन आणि कॅनडामध्ये त्यांचा विस्तार होईल. मलाबार गोल्ड अँड डायमंड्सने प्रसिद्ध अभिनेता आणि ब्रँड अम्बॅसेडर एनटीआर ज्युनियर यांच्यासोबत ग्राहक जागरूकता मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम या ब्रँडला एक जबाबदार सराफ पेढी म्हणून अधोरेखित करताना, शाश्वत पद्धतीबद्दल ध्यास, प्रमाणित हॉलमार्क केलेले दागिने आणि प्रमाणित नैसर्गिक हिऱ्यांबद्दलची त्यांची वचनबद्धता अधोरेखित करत आहे. नियोजित विस्ताराविषयी बोलताना, मलाबार समूहाचे अध्यक्ष एम.पी. अहमद म्हणाले, "आमची विस्तार योजना जागतिक स्तरावर आपला प्रभाव वाढवण्याच्या आणि जगभरातील अधिकाधिक लोकांना जागतिक दर्जाचा खरेदी अनुभव देण्याच्या आमच्या व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. आम्ही नैतिक व्यवसाय पद्धती आणि जबाबदार स्रोतांतून सोने मिळविण्याबाबत वचनबद्ध आहोत, जे आमच्या मूल्यांच्या केंद्रस्थानी आहेत. आम्ही वाढ साधत राहतो आणि नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करतो, प्रत्येक उघडले जात असलेले नवीन शोरूम हे जगातील नंबर एकचे आभूषणांचे आणि लक्झरी ब्रँड बनण्याच्या आमच्या स्वप्नाला साकार करण्याच्या दिशेने एक पुढचे पाऊल ठरत आहे.



# तंत्रज्ञानामुळे मानसिक तणाव वाढला - प्रा. डॉ. सुरेश मोनी

- **एमआयटी एडीटी'त सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेला प्रारंभ**

## तंत्रज्ञानाच्या धोक्यांपासून सावध रहा- प्रा.डॉ.कराड

**यावेळी अध्यक्षीय मनोगतात प्रा.डॉ. मंगेश कराड म्हणाले की, सध्या जगासमोर अनेक आव्हाने आहेत. रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाने भौगोलिकदृष्टा अनेक गोष्टींमध्ये मोठा बदल घडविला आहे. त्यामुळे, जागतिक पातळीवरील या आव्हानांवर विचारमंथन व्हावं यासाठी दरवर्षी ही परिषद भरवली जाते. दिवसेंदिवस बदलणाऱ्या एआय सारख्या तंत्रज्ञानाचा सकारात्मक उपयोग करत असताना त्यातील डिफेक सारख्या धोक्यांपासूनही आपण सावध रहायला हवे, असा इशाराही त्यांनी दिला.**

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

तंत्रज्ञानाने सध्या भारतासह जगाला भुरळ घातली आहे. सध्या जगात प्रत्येक महिन्यात नवीन बदल घडतो आहे. बदलाचा हा वेग प्रचंड असून त्याच्याशी जुळवून घेताना लोकांची दमछाक होताना दिसत आहे. एआय सारख्या बदलत्या तंत्रज्ञानामुळे सातत्याने माहितीचा भडीमार मानवी मेंदूवर होत आहे. त्यामुळे, त्यातून काय घ्यावं? आणि काय सोडावं? आणि समोर येणाऱ्या मजकूराची विश्वासार्हता आणि सत्यता याबाबत साशंकता असल्याने परिणामी मानसिक तणावात वाढ होत आहे, असे मत बंगळुरू येथील नार्से मोंजी इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजचे माजी संचालक प्रा. डॉ.सुरेश मोनी यांनी मांडले.

ते एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठातील संत ज्ञानेश्वर महाराज विश्व शांती डोम येथे 'इनोव्हेटिव्ह ग्लोबल टेक्नॉलॉजी ट्रेंड्स' या विषयावर आयोजित सातव्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. याप्रसंगी, अजिंक्य डी.वाय. पाटील विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ.एकनाथ खेडकर, 'एमआयटी एडीटी' विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ.मंगेश कराड, कार्यकारी संचालक प्रा.डॉ.सुनीता कराड, कुलगुरू प्रा.डॉ. राजेश एस., प्र.कुलगुरू डॉ.रामचंद्र पुजेरी, डॉ.मोहित दुबे, कुलसचिव डॉ. महेश चोपडे आदी उपस्थित होते. डॉ.खेडकर यावेळी म्हणाले की, पूर्वी पेटंट सादर करण्यात व त्याची नोंदणी होण्यावर चीन, अमेरिका आणि जर्मनी सारख्या राष्ट्रांचे एकतर्फी प्रभुत्व होते. परंतु, बदलत्या काळानुसार भारतीय संशोधकांच्या मेहनतीमुळे पेटंट नोंदणीत आता भारताने आपला दबदबा निर्माण केला आहे. यासह, चॅट जिपीटी, डीपसेक सारख्या तंत्रज्ञानामुळे मानवाचे वाचन कमी व्हायला नको, याची काळजी घ्यावयास हवी, असेही त्यांनी म्हटले. यावेळी बोलताना प्रा.डॉ.सुनीता कराड म्हणाल्या, एमआयटी एडीटी विद्यापीठ दरवर्षी ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करते. यंदा या परिषदेचे सातवे वर्ष असून त्यामाध्यमातून आत्तापर्यंत ६०+ स्टार्टअप्स व ३००० हून अधिक विद्यार्थ्यांना रोजगार देण्यात आम्ही यशस्वी ठरलो आहोत. यंदा २० हून अधिक विषय घेवून विद्यापीठात वेगवेगळ्या ठिकाणी एकाच वेळेला पुढील तीन दिवस ही परिषद पार पडणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

दीपप्रज्वलन व सरस्वती पूजेद्वारे सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.सुनीता कराड यांनी तर आभार डॉ.मोहित दुबे यांनी मानले. तर डॉ.स्नेहा वाघटकर व डॉ. स्वप्निल शिरसाठ यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. पसायदान द्वारा कार्यक्रमाची सांगता झाली.

# एअरटेलचे सर्वात परवडणारे आंतरराष्ट्रीय रोमिंग पॅक्स घेऊन जगभरात सुलभ कनेक्टिव्हिटीचा आनंद उचला

- **यू.ए.इ आणि 180 हून अधिक देशांमध्ये केल्या जाणाऱ्या कॉल्ससाठी आंतरराष्ट्रीय रोमिंग पॅक्स दररोज फक्त रु. 133 पासून सुरू होत आहेत**
- **अनेक सुविधांचा आनंद उचलता येत आहे, जसे की - विमानाच्या आत कनेक्टिव्हिटी, परदेशात आल्यावर आपोआप सेवा-सक्रिय होणे, अमर्यादित डेटा, व्हॉईस लाभ आणि 24/7 ग्राहक सेवा समर्थन (कॉन्टॅक्ट सेंटर सपोर्ट).**

**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

आता प्रवास करण्याचे दिवस सुरू होत आहेत आणि अशा वेळेस एअरटेलचे आंतरराष्ट्रीय रोमिंग पॅक्स घेऊन 180+ देशांमध्ये सुलभ कनेक्टिव्हिटीचा आनंद उचलता येणार आहे. हे प्लॅन्स उपलब्ध झाल्याने ग्राहकांना कनेक्टिव्हिटीचा त्रास सहन करावा न लागता जगभर प्रवास करता येणार आहे. प्लॅन्स दिवसाला फक्त रु. 133 पासून सुरू होत असून एअरटेल 180 हून अधिक देशांमध्ये सुलभ व्हॉईस आणि हायस्पीड डेटा कनेक्टिव्हिटी




देत परवडणारे पॅक्स उपलब्ध करून देत आहे. एअरटेलचे वाढीव डेटा लाभ, विमानाच्या आत कनेक्टिव्हिटी आणि चोवीस तास ग्राहक सेवा समर्थन, यांमुळे वापरकर्त्यांना आणखी चांगला अनुभव लाभणार आहे. ग्राहकांना विविध गंतव्यस्थानांमधून आणि ले-ओव्हर देशांमधून प्रवास करण्यासाठी एकाधिक पॅक्सची गरज भासत असते आणि याकरिता एअरटेलने साधेपणा व सोयीचे महत्त्व ओळखले असून अशा एकाधिक पॅक्सची आवश्यकता दूर केली आहे आणि त्यायोगे प्रक्रिया सुलभ केली आहे. त्याऐवजी, प्रवासी आता त्यांच्या प्रवासाच्या कालावधीनुसार एकच, सर्वसमावेशक पॅकेज निवडू शकतात, जे त्यांना जगभरात सुलभ कनेक्टिव्हिटी प्रदान करणार आहे आणि हे अप्रतिम परवडण्याजोग्या दरांमध्ये उपलब्ध होणार आहे.

फक्त ग्राहक एअरटेल थँक्स ॲपवर लॉगिन करून, https://www.airtel.in/ir-packs/ या वेबसाइटवर लॉगिन करून किंवा कोणत्याही स्थानिक दुकानांमध्ये जाऊन किंवा प्लॅन सक्रिय करण्यासाठी विमानतळावर असलेल्या किऑस्क मध्ये जाऊन, आंतरराष्ट्रीय रोमिंग सक्रिय करता येईल. नवीन आंतरराष्ट्रीय रोमिंग पॅक्स मध्ये अनेक आकर्षक वैशिष्ट्ये देण्यात आलेली आहेत, जसे की:

अनेक देशांप्रमाणे विशिष्ट पॅक खरेदी करण्याची चिंता न करता आंतरराष्ट्रीय रोमिंग सोपे केले आहे

वारंवार प्रवास करणाऱ्यांसाठी आपोआप नूतनीकरणाची सुविधा चालू ठेवली आहे

30 दिवसांच्या वैधतेच्या पॅक्स मध्ये विमानाच्या आत विनामूल्य कनेक्टिव्हिटी उपलब्ध केली आहे

सर्व नियंत्रण ग्राहकाच्या हातात आहे कारण ग्राहकाला एअरटेल थँक्स ॲपद्वारे वापर सांभाळता येतो, पॅक बदलता येतो, बिलिंग अपडेट मिळवता येतात

जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात असलेल्या ग्राहकांसाठी विनामूल्य 24×7 ग्राहक सेवा समर्थन (9910099100).

एअरटेलने महत्त्वाच्या ठिकाणी, काहींची नावे सांगायची झाली तर, अमेरिका, यू.ए.इ, यू.के, सौदी अरेबिया, थायलंड, सिंगापूर, कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि बऱ्याच अन्य ठिकाणी, प्रमुख दूरसंचार प्रदात्यांसोबत धोरणात्मक भागीदारी केली आहे आणि त्याच्या माध्यमातून हे सुनिश्चित केले आहे की, प्रवासी कॉल करत असतील, वेब सर्फिंग करत असतील, आशय स्ट्रीमिंग करत असतील किंवा घरी प्रियजनांना थेट फोटो पाठवत असतील, तरी सुद्धा ते संपर्कात राहू शकतील. या उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये प्रवास सुरु होण्याआधी, एअरटेलने सर्वात उत्तम प्रवास भागीदार बनण्याची तयारी केली असून जगाच्या दूरगामी कानाकोपऱ्यातील जागांचा शोध घेण्यासाठी आणि मार्गाच्या प्रत्येक पावलावर संपर्कात राहण्यासाठी ग्राहकांना पाठबळ पुरवत आहे. आंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी किफायतशीर आणि वैशिष्ट्यांनी समृद्ध प्रस्ताव देऊन, कंपनी प्रवासी प्रवास करीत असताना संपर्कात राहण्याच्या पद्धतीत क्रांती घडवून आणण्याच्या तयारीत आहे.

# "आकाश इन्विक्टस" – JEE तयारीसाठी अंतिम गेम-चेंजर प्रोग्राम लॉन्च

- उत्कृष्ट दर्जाचे अभ्यास साहित्य
- संपूर्ण भारतात ४०+ शहरांमध्ये ५०० हून अधिक अनुभवी JEE प्राध्यापक, ज्यांनी आतापर्यंत एक लाखाहून अधिक विद्यार्थ्यांना IIT प्रवेश मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केले आहे.
- अत्याधुनिक तंत्रज्ञान व AI समर्थित प्लॅटफॉर्म, जो वैयक्तिकृत आणि सुधारित शिक्षण अनुभव प्रदान करतो.
- आकाशच्या उच्च दर्जाच्या प्रक्रियांसह आणि प्रणालींसह समर्थित, ज्यामुळे २५ केंद्रांवर दर्जेदार आणि सातत्यपूर्ण शिक्षणाची हमी दिली जाते.
- अधिक माहितीसाठी, पालक आणि विद्यार्थी ७३०३७५९४९४ या क्रमांकावर संपर्क साधू शकतात किंवा support.invictus@aesl.in वर ईमेल करू शकतात.




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (AESL), भारतातील अग्रेसर टेस्ट प्रिपरेटरी संस्था, अभियांत्रिकी क्षेत्रातील सर्वोत्तम आणि प्रतिभावान विद्यार्थ्यांसाठी "आकाश इन्विक्टस" हा नाविन्यपूर्ण आणि उच्चस्तरीय JEE तयारी प्रोग्राम लॉन्च करत आहे. IIT किंवा प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा AI-समर्थित, वैयक्तिकृत, उच्च-तीव्रतेचा आणि निकाल-केंद्रित उपक्रम आहे.

आकाश इन्विक्टस अंतर्गत ५०० हून अधिक JEE तज्ज्ञ शिक्षक एकत्र येणार आहेत, ज्यांचा IIT मार्गदर्शनात सिद्धहस्त अनुभव आहे. सर्वोच्च IIT रँक मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी हा अभ्यासक्रम आधुनिक आणि नीटनेटका पद्धतीने तयार करण्यात आला आहे. हा प्रोग्राम फिजिटल शिक्षण पद्धतीचा अवलंब करतो, जिथे AI-सक्षम आणि अडॅप्टिव्ह लर्निंगचा उपयोग करून विद्यार्थ्यांना JEE Advanced परीक्षेच्या सर्वोत्तम तयारीसाठी विशेष अध्ययन संसाधने दिली जातील.

या कठोर अभ्यासक्रमात संपूर्ण पुनरावलोकन आणि चाचणी मॉड्यूल समाविष्ट आहे, जे विद्यार्थ्यांना परीक्षेच्या अंतिम टप्प्यात केंद्रित तयारी करण्यास मदत करेल. विद्यार्थ्यांना विशेष अभ्यासक्रम, शंका-निवारण सत्रे आणि उत्कृष्ट निकाल मिळवण्यासाठी संपूर्ण नियोजित टेस्ट सिरीजचा लाभ मिळेल. आकाश इन्विक्टस लहान बॅचेसमध्ये शिकवले जाईल, जेणेकरून प्रत्येक विद्यार्थ्याला वैयक्तिक लक्ष दिले जाऊ शकेल.

आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. दीपक मेहरोत्रा यांनी या कार्यक्रमाच्या महत्त्वावर भर देत सांगितले, "आकाश इन्विक्टस हा केवळ एक कोचिंग प्रोग्राम नसून IITमध्ये सर्वोच्च रँक मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक परिवर्तनकारी प्रवास आहे. हा प्रोग्राम दशकांचा अनुभव असलेल्या नामांकित प्राध्यापकांना एकत्र आणतो, अत्याधुनिक अध्यापन पद्धतींचा समावेश करतो आणि AI तसेच तंत्रज्ञान-समर्थित वैयक्तिकृत शिक्षण प्रदान करतो. गेल्या काही वर्षांत, आमच्या शिक्षकांनी लाखो विद्यार्थ्यांना IIT मध्ये प्रवेश मिळवण्यासाठी यशस्वीरित्या मार्गदर्शन केले आहे. अभ्याससामग्री पूर्णपणे सुधारित करण्यात आली असून, संपूर्ण अभ्यासक्रम समाविष्ट करून उद्योगातील काही सर्वोत्तम तज्ज्ञांनी ती विकसित केली आहे. आम्हाला ठाम विश्वास आहे की हे सर्वोत्तम आहे – जर तुम्ही त्यापेक्षा चांगले साहित्य तयार करू शकता, तर आम्ही तुम्हाला सन्मानित करू आणि आमच्या संघात सामील होण्यासाठी आमंत्रित करू."

ते पुढे म्हणाले, "हा कार्यक्रम काही महिन्यांपूर्वी सुरू करण्यात आला असून, आतापर्यंत 2500+ सर्वोत्तम विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. तीन मुख्य आधारस्तंभांवर उभा असलेला – नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती व अभ्याससाहित्य, तज्ज्ञ प्राध्यापक आणि प्रगत AI साधने – 'आकाश इन्विक्टस' JEE तयारीसाठी नवीन मानदंड निर्माण करेल. हे सर्व वैशिष्ट्ये आकाशच्या विश्वासार्हता, गुणवत्तेच्या वचनबद्धतेसह तांत्रिक कौशल्याने समर्थित आहेत." या कार्यक्रमाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अभ्यास संसाधनांमध्ये करण्यात आलेले नाविन्यपूर्ण बदल. विद्यार्थ्यांना अध्यायनिहाय सराव कार्यपत्रिका दिल्या जातील, ज्यामध्ये QR कोड अंतर्भूत असतील, जे सविस्तर समाधान आणि टप्प्याटप्प्याने मार्किंग योजना प्रदान करतील. यामुळे त्यांची शालेय व बोर्ड परीक्षांसाठी तयारीही उत्कृष्ट होईल. याशिवाय, विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक ऑलिम्पियाड कार्यशाळा, जुन्या JEE प्रश्नसंचांचे सखोल विश्लेषणासह संग्रहण, तसेच 'JEE चॅलेंजर' संसाधन उपलब्ध असेल, जे त्यांचे धोरण अधिक परिष्कृत करण्यासाठी सखोल विश्लेषण, सराव प्रश्न आणि अंतर्दृष्टी प्रदान करेल. याशिवाय, हा कार्यक्रम फिजिटल (Physical + Digital) अभ्यास साहित्याचा समावेश करतो, जे भौतिक आणि डिजिटल संसाधनांचे मिश्रण करून जटिल संकल्पना सुलभ करते. तसेच, विद्यार्थी तज्ज्ञ प्राध्यापकांनी तयार केलेल्या रेकॉर्ड केलेल्या व्हिडिओ व्याख्यानांमधून लवचिक आणि ऑन-डिमांड शिक्षणाचा लाभ घेऊ शकतात.

'आकाश इन्विक्टस' मध्ये प्रवेश अत्यंत निवडक पद्धतीने दिला जातो. केवळ सर्वोत्कृष्ट आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांना प्रवेश मिळावा यासाठी खास प्रवेश चाचणी घेतली जाते. हा कार्यक्रम ११वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दोन वर्षांचा आणि १०वीमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तीन वर्षांचा आहे. हा कोर्स दिल्ली NCR, चंदीगड, लखनऊ, मेरठ, प्रयागराज, कानपूर, वाराणसी, जयपूर, कोटा, पटना, रांची, बोकारो, कोलकाता, दुर्गापूर, भुवनेश्वर, मुंबई, पुणे, नागपूर, अहमदाबाद, वडोदरा, इंदौर, भोपाळ, हैदराबाद, चेन्नई, बेंगळुरू, देहरादून आणि मदुराई यासारख्या ४०+ शहरांमध्ये उपलब्ध असेल. हा कोर्स उच्च शैक्षणिक निकष व सतत बदलणाऱ्या परीक्षेच्या स्वरूपाशी सुसंगत राहील, याची खात्री करण्यासाठी एक समर्पित संशोधन संघ या अभ्यासक्रमाची निर्मिती करत आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना परिवर्तनात्मक शैक्षणिक अनुभव मिळेल.

## थोडक्यात

### सुनील तांबे यांची श्री काळभैरवनाथ ट्रस्टच्या विश्वस्तपदी निवड



**लोणी काळभोर (आरंभ पर्व) :** सुनील आबुराव तांबे यांची उरुळी कांचनचे ग्रामदैवत असलेल्या श्री काळभैरवनाथ सेवा समिती ट्रस्टच्या विश्वस्त पदी निवड करण्यात आली . सुनील तांबे हे उरुळी कांचन ग्रामपंचायतचे विद्यमान ग्रामपंचायत सदस्य असून गेली १५ वर्षे श्री काळभैरवनाथ उत्सव समितीच्या सचिव पदी कार्यरत होते. समाजसेवेची व सामाजिक कार्याची आवड असलेल्या व त्यांच्या चांगल्या कार्याची, कामाची दखल घेऊन त्यांची ही निवड करण्यात आली . गावाची व देवाची सेवा करण्याची संधी प्राप्त झाली याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. श्री काळभैरवनाथ उत्सव समितीच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी अध्यक्ष राजाराम कांचन , महादेव कांचन, लक्ष्मण जगताप, एकनाथ चौधरी , जयप्रकाश बेदरे , नंदकिशोर बगाडे , राजेंद्र टिळेकर , बाळासाहेब तुपे, शरद खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते . त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे.

### 'कोकणच्या राजाच्या' अस्मितेसाठी आ.शेखर निकम यांनी उठवला आवाज



**मुंबई (आरंभ पर्व) :** महाराष्ट्र अर्थसंकल्पीय अधिवेशनात आमदार शेखर निकम यांनी कोकणच्या अस्मितेचा मुद्दा लावून धरला. हापूस आंबा हा केवळ रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा अभिमान आहे, असे ठाम प्रतिपादन त्यांनी केले. "हापूस आंबा ही कोकणच्या शेतकऱ्यांच्या घामाची गोड फळे आहेत. मात्र, बाजारात 'हापूस' या नावाखाली इतर भागांतील आंबे विकले जात आहेत. हे अन्यायकारक असून रत्नागिरी-सिंधुदुर्गच्या अस्सल हापूसची ओळख टिकवणे आवश्यक आहे," असे त्यांनी स्पष्ट शब्दांत मांडले. त्यांच्या या ठाम भूमिकेला मंत्रिमहोदयांनी सकारात्मक प्रतिसाद देत, या विषयावर योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. आमदार शेखर निकम यांच्या या ठाम भूमिकेमुळे कोकणच्या हापूस आंब्याच्या अस्मितेला नवी ताकद मिळाली आहे. कोकणातील शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण होईल आणि जागतिक बाजारपेठेत रत्नागिरी-सिंधुदुर्ग हापूस आंब्याची अस्सल ओळख टिकून राहील, असा विश्वास आहे.

## शनिवारी काचबिंदू जागृतीसाठी सायकल रॅली

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

जागतिक काचबिंदू सप्ताहाचे औचित्य साधून पुण्यातील मुलानी आय केअर सेंटरच्या वतीने काचबिंदू जागृतीसाठी सायकल रॅलीचे आयोजन केले आहे. येत्या शनिवारी (ता. २२) सायंकाळी ५ वाजता पुणे कॅम्प परिसरात ही सायकल रॅली निघणार आहे. मुलानी आय केअर सेंटरचे डॉक्टर्स, कर्मचारी, स्वयंसेवक, विद्यार्थी, पोलीस बांधव या सायकल रॅलीमध्ये सहभागी होणार आहेत. तसेच मुलानी आय केअर सेंटरतर्फे २४ व २५ मार्च २०२५ या दिवशी दुपारी २ ते ६ या वेळेत एमजी रस्त्यावरील मुलानी आय केअर सेंटरमध्ये मोफत काचबिंदू तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे. अधिकाधिक नागरिकांनी या मोफत काचबिंदू व नेत्रतपासणी शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन सेंटरच्या प्रमुख डॉ. समिता मुलानी-कटारा यांनी केले.




## क्षेत्रभेटीच्या माध्यमातून पत्रलेखन : अनोखा उपक्रम

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ संचलित महेश विद्यालय मराठी माध्यमाच्या शाळेतील इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी मराठी विषयांतर्गत 'वडिलांस पत्र' हा उपक्रम पौड रोड येथील एक्स सर्विसमेन उपटपाल कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन घेतला. 21व्या शतकातील शालेय विद्यार्थ्यांना संदेशवहनाची साधने पोस्ट कार्ड, आंतरदेशीय पत्र, पाकीट याविषयी माहिती व्हावी या उद्देशाने विद्यालयाने हा उपक्रम घेतला. पोस्ट ऑफिसमध्ये चालणारे व्यवहार, पोस्टमनची ड्युटी, कामाच्या वेळा, जीवनपद्धती या सर्व बाबींविषयी विद्यार्थ्यांनी त्यांच्या मुलाखती घेतल्या.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाचे युगात ई-मेल whatsapp, इंटरनेट या माध्यमाचा उपयोग पोस्ट कर्मचाऱ्यांनी त्यांच्या कार्यात अत्यंत कुशलपणे केला आहे. याची माहिती त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. पूर्वीची संदेशवहनाची साधने व पद्धती आणि अलीकडच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या काळातील संदेशवहनाची साधने व पद्धती याची सुरेख सांगड पोस्ट कर्मचाऱ्यांनी घातलेली आहे.




इयत्ता सहावीतील सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या वडीलास शाळेतील आगामी कार्यक्रम व सुट्टी विषयीचे पत्र लिहिले व पोस्टमन काकांना ते दाखविले आणि पोस्ट पेटीत ते टाकले. दत्तात्रय ढावरे, वैशाली काळे, प्रियांका वाळुंज, नम्रता वाकोडकर, शर्मिला देशमुख, किशोर पवार यांनी या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेतला. क्षेत्रभेटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभूती देण्यासाठी हा उपक्रम शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जान्हवी अजोतीकर यांनी राबविला.

## होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया पुणे, महाराष्ट्र येथे रस्ते सुरक्षा जनजागृती अभियान राबवते

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

होंडा मोटरसायकल आणि स्कूटर इंडिया (HMSI) ने पुणे, महाराष्ट्र येथे रस्ते सुरक्षा जनजागृती अभियानाच्या माध्यमातून रस्ते सुरक्षेवर आपला भर पुन्हा अधोरेखित केला. या उपक्रमात रेडियंट इंटरनॅशनल स्कूल, श्री जे. आर. गुंजाळ इंग्रजी माध्यमिक शाळा आणि ज्युनियर कॉलेज, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च आणि ग्रामोन्नती मंडळ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज या संस्थांमधील २२०० हून अधिक विद्यार्थी आणि कर्मचारी सहभागी झाले आणि जबाबदार रस्ते वर्तनाविषयी मूलभूत ज्ञान प्राप्त केले.




लहान वयातच रस्ते सुरक्षा शिक्षणाची सवय लागावी या उद्देशाने HMSI ने हा उपक्रम राबवला. केवळ जनजागृती करून थांबण्यापेक्षा हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये दीर्घकालीन सकारात्मक वर्तनशील बदल घडवण्यावर केंद्रित आहे. लहानपणीच योग्य रस्ते वर्तनाची सवय लावल्याने ते जबाबदार रस्ते वापरकर्ते होऊ शकतात आणि त्यांच्या आजूबाजूच्या लोकांवरही चांगला प्रभाव टाकू शकतात. शाळा, महाविद्यालये आणि शासकीय व अशासकीय संस्थांबरोबर सहकार्य करत HMSI रस्ते सुरक्षेला दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवत आहे.

या अभियानामध्ये सुरक्षित वाहन चालवण्याचे धडे, धोका ओळखण्याचे प्रशिक्षण, खेळ, प्रश्नमंजुषा, हेल्मेट जनजागृती आणि राइडिंग ट्रेनर मॉड्यूल्स यांचा समावेश करण्यात आला. हे सर्व इंटरॅक्टिव्ह आणि व्यावहारिक उपक्रम असल्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ रस्ते सुरक्षा नियम शिकण्यास मदत झाली नाही, तर रस्त्यावर असताना जबाबदारीची जाणीवही निर्माण झाली.

HMSI ने रेडियंट इंटरनॅशनल स्कूल, श्री जे. आर. गुंजाळ इंग्रजी माध्यमिक शाळा आणि ज्युनियर कॉलेज, गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च आणि ग्रामोन्नती मंडळ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज यांचे या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मनःपूर्वक आभार मानले. विद्यार्थ्यांचा आणि कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त सहभाग जबाबदार रस्ते वर्तनाबद्दल जागरूकता निर्माण करण्यास आणि सुरक्षित रस्त्यांसाठी कार्य करण्यास उपयुक्त ठरला.

HMSI ने आपल्या सातत्यपूर्ण रस्ते सुरक्षा मोहिमेच्या माध्यमातून आतापर्यंत महाराष्ट्रातील सुमारे ३ लाख नागरिक आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचून त्यांना रस्ते सुरक्षा विषयक व्यावहारिक ज्ञान प्रदान केले आहे. अशा उपक्रमांच्या मदतीने HMSI रस्ते सुरक्षा जनजागृती निर्माण करत राहील आणि सर्वांसाठी जबाबदार वाहन चालवण्याच्या सवयी प्रोत्साहित करत राहील.

२०२१ मध्ये, होंडाने २०५० सालासाठी जागतिक दृष्टीकोन जाहीर केला ज्यामध्ये होंडा मोटरसायकल आणि ऑटोमोबाईल्सच्या सहभागाने होणाऱ्या अपघाती मृत्यू शून्यावर आणण्याचे लक्ष्य ठेवले आहे. भारतात, HMSI हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कार्यरत आहे आणि २०३० पर्यंत अपघाती मृत्यूंची संख्या निम्म्यावर आणण्याच्या भारत सरकारच्या दिशानिर्देशांनुसार काम करत आहे.

## होळकरांचा वास्तव इतिहास जगासमोर आणणे गरजेचे

**नवनाथ पडळकर**



**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकर यांची शौर्यगाथा आणि वास्तव इतिहास जगासमोर आणणे गरजेचे असून त्याचे पुनर्लेखन करणे आवश्यक आहे. असे प्रतिपादन भाजपचे राज्य सचिव नवनाथ पडळकर यांनी वाफगाव (ता. खेड) येथे केले.

वाफगाव येथील किल्ल्यात सुभेदार मल्हारराव होळकर यांचा जयंती उत्सव साजरा झाला. यावेळी ते बोलत होते. यावेळी व्यासपिठावर माजी उपसरपंच अजय भागवत, नितीन लंगोटे, अमर बोऱ्हाडे, प्रा. बाळासाहेब आसवले, सुनिता देवकर, पत्रकार ईसाक मुलाणी, पोलीस पाटील माऊली कराळे , धनंजय भागवत, गणेश सुर्वे, गणेश कराळे, ओंकार सोनार, अतुल कुऱ्हाडे , विजय खेमनर, रामदास चिंतले, बाळासाहेब वायकुळे, रेवण दिवटे, योगेश खरात, भारत सातपुते, सुनिल होळकर, महादेव बोराटे आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना ते म्हणाले की, येथील होळकर किल्ल्याच्या संवर्धनाचे काम सध्या प्रगतीपथावर आहे. यासाठी वाढीव निधीची मागणी आपण राज्य सरकारकडे करणार आहे. श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर स्मारक संवर्धन समितीच्या वतीने यावर्षी प्रथमच वाफगाव येथील किल्ल्यात मल्हारराव होळकर यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मान्यवरांच्या हस्ते सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आहे. होळकर प्रेमी व ग्रामस्थांनी होळकरांचा जयघोष केला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी स्मारक समिती पदाधिकारी कै.नवनाथ बुळे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शिरूर पंचायत समितीचे माजी सभापती बबनराव शेळके, कार्यक्रमाचे मुख्य आयोजक डॉ.इंद्रकुमार भिसे, स्कुल कमिटी सदस्य धनंजय भागवत, स्मारक समिती महासचिव भगवानराव ज-हाड, माजी उपसरपंच विकास कराळे, होळकर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री आसवले, योगेश घरम यांची समायोचित भाषणे झाली.

समितीचे कोषाध्यक्ष योगेशराजे होळकर यांनी स्वागत केले आणि स्मारक समितीचे महासचिव भगवानराव ज-हाड यांनी प्रास्ताविक केले.

कार्यक्रमाचे संयोजन खंडु तांबडे, योगेश धरम, मयुर थिटे, योगेश पोटे, चंद्रकांत लबडे यांनी केले.

कार्यक्रमापूर्वी होळकर किल्ल्याच्या संवर्धन कामाची पाहणी मान्यवरांनी केली व काम प्रगतीपथावर असल्याने समाधान व्यक्त केले.



# जागतिक व्यापारावर वर्चस्व मिळवण्याची संधी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारताच्या बियाणे उद्योगासाठी मजबूत बौद्धिक संपदा हक्क (IPR) संरचना विकसित करणे अत्यावश्यक आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे. उच्च दर्जाच्या बौद्धिक संपदा संरक्षणामुळे भारत जागतिक बियाणे व्यापारामध्ये मोठे स्थान मिळवू शकतो. तसेच, शेतकऱ्यांचे बनावट आणि नकली बियाण्यांपासून संरक्षण होऊन उत्पादन अधिक स्पर्धात्मक बनेल.




महाराष्ट्र सरकारच्या कृषी विभागाचे मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी (QC), बियाणे उद्योगातील नेते आणि तज्ज्ञांच्या उपस्थितीत पार पडलेल्या परिषदेत, बौद्धिक संपदा हक्क आणि संबंधित कायद्यांची अंमलबजावणी अधिक कठोर करण्याची मागणी करण्यात आली. फेडरेशन ऑफ सीड इंडस्ट्री ऑफ इंडिया (FSII), भारत सरकारच्या प्लांट वॅरायटीज अँड फार्मर्स राइट्स अथॉरिटी (PPVFRA) आणि महाराष्ट्र कृषी विभागाच्या संयुक्त विद्यमाने या परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषदेत शेतकरी, बियाणे उद्योगातील तज्ज्ञ आणि सरकारी अधिकारी यांनी बौद्धिक संपदा संरक्षण, नकली बियाण्यांवरील नियंत्रण आणि बियाणे बाजार अधिक सुरक्षित करण्यावर चर्चा केली.

महाराष्ट्र कृषी विभागाचे मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रवीण देशमुख यांनी शेतकरी आणि उद्योग क्षेत्रामध्ये जागरूकतेच्या अभावामुळे बियाणे चोरीच्या घटना वाढत असल्याचे सांगितले. राज्य सरकारने व्यापक जनजागृती मोहिमा, प्रशिक्षण कार्यक्रम आणि नियामक कार्यशाळांचे आयोजन करणे आवश्यक आहे, जेणेकरून शेतकऱ्यांना अधिकृत बियाण्यांच्या वापराचे फायदे समजतील.

PPVFRA चे अध्यक्ष आणि माजी सचिव, DARE व DG, ICAR, डॉ. त्रिलोचन महापात्रा यांनी धोरणे ठरविताना शेतकरी केंद्रस्थानी असले पाहिजेत, असे प्रतिपादन केले. त्यांनी प्रभावी बौद्धिक संपदा संरक्षणामुळे शेतीत प्रगती होईल आणि शेतकऱ्यांना अधिक फायदे मिळतील, असे सांगितले. "खाजगी क्षेत्राकडून सुमारे दोन-तृतीयांश औपचारिक बियाणे पुरवठा केला जातो. त्यामुळे सर्व भागधारकांसाठी बौद्धिक संपदा हक्क आणि प्लांट वॅरायटी संरक्षण (PVP) याबाबत व्यापक जागरूकता आवश्यक आहे. नोंदणी न झालेल्या बियाण्यांमुळे गुणवत्ता धोक्यात येते आणि शेतकऱ्यांसाठी संकट निर्माण होते," असे डॉ. महापात्रा यांनी स्पष्ट केले.

डॉ. महापात्रा यांनी सांगितले की, प्रादेशिक भिन्नता, एकसंधता, स्थिरता आणि नावीन्य यावर आधारित नोंदणी प्रणाली तयार करणे आवश्यक आहे. "आम्ही IPR उल्लंघनांविरोधात तात्पुरती सुरक्षा आणि दंडात्मक कारवाईसाठी नवीन मार्गदर्शक तत्त्वे तयार करत आहोत," अशी माहिती त्यांनी दिली.

कापूस आणि इतर महत्त्वाच्या पिकांसाठी IPR अंमलबजावणी बळकट करणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळतील आणि शेती उत्पादन वाढण्यास मदत होईल. FSII चे कार्यकारी संचालक राघवन संपतकुमार यांनी सांगितले की, गुंतागुंतीच्या नियामक वातावरणाचा सामना करणे हे उद्योग क्षेत्रासाठी मोठे आव्हान आहे.

"संवाद आणि ज्ञान सामायिकरणाला चालना देऊन आपण नवसंशोधन आणि शाश्वत कृषी पद्धतींसाठी अनुकूल वातावरण निर्माण करू शकतो," असे त्यांनी नमूद केले.

**बनावट बियाण्यांविरोधात कठोर कारवाईची गरज**

बियाणे चोरीच्या वाढत्या संकटाला सामोरे जाण्यासाठी धोरणकर्ते, बियाणे कंपन्या आणि अंमलबजावणी यंत्रणांमध्ये समन्वय साधण्याची गरज आहे. बनावट बियाण्यांची विक्री करणाऱ्यांविरोधात कठोर कायदे आणि दंड लागू करणे, बियाणे प्रमाणन प्रक्रिया सुधारणा करणे आणि मागोवा यंत्रणांना चालना देणे यासारख्या उपाययोजना चर्चेत आल्या.

PPVFRA चे निबंधक डॉ. दिनेश अग्रवाल यांनी महाराष्ट्र शासन आणि FSII चे या चर्चासत्रासाठी आभार मानले. "भारतातील समृद्ध कृषी जैवविविधता आपल्या शेतकऱ्यांमुळे टिकून आहे. कृषी क्षेत्रातील ५०% बायोडायवर्सिटी नोंदणी शेतकऱ्यांनी केली आहे. नव्या पिकांच्या जाती विकसित करण्यासाठी शेतकरी, खाजगी क्षेत्र आणि सार्वजनिक संस्थांचे योगदान मोठे आहे. आज भारत विविधतेच्या नोंदणीमध्ये जागतिक स्तरावर दुसऱ्या क्रमांकावर आहे. आमचे उद्दिष्ट शेतकऱ्यांना विविध पीक पर्याय उपलब्ध करून देणे, बौद्धिक संपदा हक्क संरचनेअंतर्गत परवाना प्रणाली सहज आणि प्रभावी बनवणे आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

भारताच्या बियाणे उद्योगासाठी पुढील दिशा : भारताच्या बियाणे उद्योगाला मोठ्या विस्ताराच्या दिशेने नेण्यासाठी मजबूत बौद्धिक संपदा हक्क संरक्षण महत्त्वाचे आहे. शेतकऱ्यांचा विश्वास जपण्यासाठी, संशोधनाधारित वाढीला चालना देण्यासाठी आणि बनावट बियाण्यांचा प्रसार थांबवण्यासाठी कठोर नियम अंमलात आणणे आवश्यक आहे. तज्ज्ञांच्या मते, धोरण सुधारणा, उद्योग सहकार्य आणि शेतकरी शिक्षण यांच्या संयोजनाद्वारेच पुढील प्रगती साधता येईल.




दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.